१२ ऑगस्ट २०१२ (लोकमत)

# १२ व्या योजनेत शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल - डॉ. जाधव

## कालीदास संस्कृत विद्यापीठाद्वारे विद्वत्जनांचा सन्मान

नागपूर। दि. ११ (प्रतिनिधी)

**संपूर्ण** जगात २०३० साली भारत सर्वांत तरुण देश राहणार आहे. युवकांच्या ऊर्जेला दिशा देण्यासाठी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार असून १२ व्या योजनेत हे बदल दिसतील. येत्या दोन वर्षांत आपली शिक्षण व्यवस्था गुणवत्ता, दर्जाच्या दृष्टीने संपूर्ण बदललेली असेल, अशी माहिती योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

कालीदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने संस्कृत, पाली, प्राकृत भाषांमध्ये उल्लेखनीय ज्ञानसंपादन आणि अध्यापन करणाऱ्या १७ विद्वत्जनांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंकज चांदे तर ज्येष्ठ विचारवंत मा. गो. उपाख्य बाबुराव वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते.



ज्येष्ठ विचारवंत मा. गो. उपाख्य बाबुराव वैद्य यांना सन्मानपत्र देऊन सत्कार करताना योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव. सोबत कालीदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंकज चांदे.

आयएमए सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात डॉ. जाधव यांच्या हस्ते मा. गो. वैद्य, तर्कशास्त्रावर प्रभुत्व असलेले डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे, तत्त्वविभूषण ॲड. के. एच. देशपांडे, डॉ. डी. के. खरवंडीकर, डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी, पं. वसंत गाडगीळ, स्वामिनी ब्रह्मप्रकाशानंदा, डॉ. सिंधू डांगे, पं. मोरेश्वर घैसास, स्वामी भद्रेशस्वामी, डॉ. कलाचार्या, डॉ. भागचंद्र जैन, डॉ. शैलजा बापट, डॉ. बालचंद्र खांडेकर, पं. कृष्णशास्त्री आर्वीकर, डॉ. भाग्यलता पाटस्कर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. जाधव म्हणाले, तरुणाईच्या ऊर्जेच्या उपयोगातून सामाजिक स्थैर्य निर्माण होणार आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क अंतर्गत देशातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि संशोधन एका टिचकीवर आंतरजाळ्यावर उपलब्ध होतील, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना मा. गो. वैद्य म्हणाले, विविध भाषेत उच्चार आणि त्याच्या आकृतिबंधात बदल होतो; पण संस्कृतमध्ये तसे नाही. संस्कृत मराठीपेक्षा सोपी भाषा आहे. संपूर्ण भारताला जोडणारी ही भाषा आहे, असे ते म्हणाले.

### ज्येष्ठ नागरिकांना संशोधनात सूट

वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आता पीएच.डी. करता येणार आहे. देशातल्या कुठल्याही विद्यापीठात त्यांना संशोधन करता येणार असून ज्येष्ठ नागरिकांसाठी संशोधन करण्यासाठी लागणाऱ्या नियमातून सूट मिळेल. त्यांच्या ज्ञानाचा समाजाला लाभ व्हावा, हा त्यामागचा उद्देश असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

# विद्यापीठे-कॉलेजेसचे होणार 'नॉलेज नेटवर्क'

नागपूर ■ म.टा. प्रतिनिधी १२ ऑगस्ट १२

कला, वाणिज्य आणि विज्ञान या परंपरगात शैक्षणिक शाखा आता पूर्णपणे कालबाह्य व विसंगत झाल्या आहेत. त्यामुळे विकसित राष्ट्र होण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधनात्मक कार्याला पर्याय नाही. यासाठीच १२ व्या पंचावार्षिक योजनेत 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' ही महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे. यामध्ये देशभरातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये व तेथील ग्रंथालये एकमेकांना जोडून एकात्मिक केली जातील, अशी माहिती नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे शनिवारी संस्कृत, पाली व पाकृत या भाषांसाठी जीवन व्यतीत करणाऱ्या तज्ज्ञांचा डॉ. जाधव यांच्याहस्ते आयएमए सभागृहात सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार मा.गो. वैद्य विशेष अतिथी होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. चांदे



■ डॉ. बालचंद्र खांडेकर यांचा सत्कार करताना नरेंद्र जाधव. पंकज चांदे .

अध्यक्षस्थानी होते. सामान्य संशोधनासाठी आवश्यक असलेले कुठलेही नियम न लावता ज्येष्ठांना (वय ५५ च्या पुढे) पीएचडी करण्याची आगळी योजना नियोजन आयोग मांडणार आहे. हा उपक्रम डॉ. जाधव यांच्या नेतृत्त्वात पुणे विद्यापीठाने राबवला होता. मात्र यूजीसीने त्यावर बंदी आणली. आता नियोजन आयोगावर गेल्यानंतर ते स्वतः यूजीसीला ही योजना सुरू करण्यास सांगणार आहेत.

समारंभात मान्यवरांना विविध पदवी बहाल करून त्यांचा सत्कार करण्यात आला विवेकविभूषण नी.र. वऱ्हाडपांडे, महामहोपाध्याय मा.गो. वैद्य, तत्त्वविभूषण ॲड. के.एच. देशपांडे, महामहोपाध्याय प्रा. एस.डी. जोशी, वृत्तविद्यारत्न पं. वसंत गाडगीळ, वेदविभूषण डॉ. टी.एन. धर्माधिकारी, महामहोपाध्याय डॉ. डी.के. खरवंदीकर, महामहोपाध्याय डॉ. भागचंद्र जैन, महामहोपाध्याय डॉ. सिंधू डांगे, पालिविभूषण डॉ. भालचंद्र खांडेकर, महामहोपाध्याय डॉ. कला आचार्य, वेदान्तविभूषण डॉ. शैलजा बापट, महामहोपाध्याय स्वामिनी ब्रह्मप्रकाशानंद, वेदविभूषण डॉ. भाग्यलता पाटस्कर, महामहोपाध्याय मोरेश्वर घैसास, महामहोपाध्याय कृष्णाशास्त्री आर्वीकर, महामहोपाध्याय स्वामी भद्रेश दास.

१२ ऑगस्ट २०१२ (सकाळ)

# शिक्षणातून समाजाचे संगोपन व्हावे : डॉ. नरेंद्र जाधव

## संस्कृत, साहित्य, धर्म, संस्कृती, शास्त्रातील विद्वानांचा सत्कार

**नागपूर, ता. ११ :** अलीकडच्या काळात शिक्षण आणि समाज या दोन वेगवेगळ्या संकल्पना असल्याचे रूढ होत आहे; मात्र शिक्षण व समाज या दोन वेगवेगळ्या संकल्पना नाहीत. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे संगोपन होऊन सामाजिक बांधीलकी जोपासावी, असे प्रतिपादन योजना आयोगाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वतीने आयएमए सभागृहात आयोजित संस्कृत, साहित्य, धर्म, संस्कृती, शास्त्रातील १७ विद्वानांच्या सत्कार कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पंकज चांदे, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार मा. गो. वैद्य उपस्थित होते. डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, 'भारत हा तरुणांचा देश म्हणून २०२० मध्ये समोर येणार आहे. त्यामुळे देशाला तरुणाईच्या रूपाने एक वरदान प्राप्त झाले आहे. ही संधी न दवडता त्यातून देशाचा विकास साधण्याची गरज आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यासाठी भरपूर निधीही देण्यात आलेला आहे. त्यामुळे आमूलाग्र बदल होणार असून तब्बल १४ वेगवेगळी विधेयके येणार असल्याचे सांगितले.

यावेळी त्यांनी विविध योजनांची माहिती देत, शिक्षणाला आगामी काळात देशात महत्त्वपूर्ण स्थान देण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. प्रमुख पाहुणे मा. गो. वैद्य यांनी संस्कृत भाषा प्रत्येकानेच शिकावी, असे सांगून तिचा राग करू नका, असा सल्ला दिला. यावेळी त्यांनी संस्कृत भाषा सर्व भारताला जोडणारी भाषा असल्याचे सांगितले. कार्यक्रमात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते मा. गो. वैद्य, स्वामी भद्रेशदास, स्वामिनी ब्रह्मप्रकाशानंद, मोरेश्वर घैसास, के. एच. देशपांडे, नी. र. वऱ्हाडपांडे, पं. वसंत गाडगीळ, डॉ. टी. एन. धर्माधिकारी, डॉ. डी. के. खरवंडीकर, डॉ. सिंधू डांगे, डॉ. भागचंद्र जैन, डॉ. बालचंद्र खांडेकर, डॉ. कला आचार्या, डॉ. शैलजा बापट, डॉ. भाग्यलता पाटस्कर, कृष्णशास्त्री आर्वीकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रो. एस. डी. जोशी हे अनुपस्थित होते. कार्यक्रमात कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांनीही आपले विचार व्यक्त केले. संचालन प्रा. नंदा पुरी यांनी केले, तर प्रा. कविता होले यांनी आभार मानले.



**उत्तर अंबाझरी मार्ग :** सत्कार कार्यक्रमात महामहोपाध्याय या उपाधीने ज्येष्ठ पत्रकार मा.गो. वैद्य यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करताना योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव. डाव्या बाजूला कुलगुरू डॉ. पंकज चांदे.

सकाळ १२ ऑगस्ट २०१२

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी 'एनसीएचईआर'ची स्थापना होणार

## डॉ. नरेंद्र जाधव : केंद्राच्या कॅबिनेटची संमती, संसदेत मंजुरीसाठी विधेयक

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ११ : देशात गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षणाची गरज असताना विद्यापीठ अनुदान आयोग, एआयसीटीई, एनसीटीई, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियासारख्या महत्त्वपूर्ण संस्थांचे काम समाधानकारक नाही. या सर्व संस्थांची पुनर्स्थापना करून नॅशनल कौन्सिल फॉर हायर एज्युकेशन ॲण्ड रिसर्चची (एनसीएचईआर) स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती योजना आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना दिली.



डॉ. नरेंद्र जाधव

डॉ. जाधव म्हणाले, "देशात उच्चशिक्षणाची अवस्था अतिशय वाईट आहे. महाविद्यालयात अतिशय कमी प्रमाणात शिक्षक आहेत. जे शिक्षक आहेत, त्यांच्यामध्ये गुणवत्ता नाही. याशिवाय विद्यापीठाच्या स्तरावर असलेल्या ॲकेडमिक स्टाफ कॉलेजेसची अवस्थाही दयनीय आहे. एवढेच नव्हे, विद्यापीठ आणि इतर टेक्निकल व मेडिकल संस्थांवर नियंत्रण ठेवणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आहे. तेव्हा गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार, असा प्रश्न आहे.

तेव्हा त्या सर्व संस्था बरखास्त करून 'एनसीएचईआर'सारख्या एकाच संस्थेच्या माध्यमातून उच्चशिक्षणामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने पंतप्रधानांनी एक समिती नेमली. त्या समितीने एक 'ड्राफ्ट' तयार केला आहे. त्याला केंद्र सरकारच्या कॅबिनेटने मंजुरी दिली आहे. आता हे विधेयक रूपात संसदेमध्ये सादर करण्यात येणार आहे.

मात्र, देशातील अनेक शिक्षण संस्था या राजकीय व्यक्तींच्या असल्याने ते नेमक्या कोणत्या स्वरूपात बाहेर येते, याबाबत सांगता येणे शक्य नाही. 'राईट टु एज्युकेशन'बाबत बोलताना त्यांनी जे राज्य त्याला प्रभावीपणे राबवेल, त्यालाच केंद्राकडून निधी मिळणार असल्याचे स्पष्ट केले. याशिवाय 'राईट टु एज्युकेशन' ही निरंतर चालणारी योजना असल्याने एका वर्षाच्या आधारावर त्याची यशस्विता ठरविता येणे अशक्य असल्याचे ते म्हणाले.

### 'मेटा युनिव्हर्सिटी' क्रांतिकारी निर्णय

देशातील विविध विद्यापीठांना जोडण्यासाठी एका वर्षात 'मेटा युनिव्हर्सिटी' ही संकल्पना रुजविण्यात येणार आहे. त्या माध्यमातून देशातील विविध विद्यापीठांत १५०० नार्स तयार करण्यात येतील. त्यानुसार सध्या ३४५ नार्स तयार करण्यात आले असून, एका वर्षात उर्वरित नार्स तयार करण्यात येतील. त्यातून कुठल्याही वर्षाला, कुठल्याही शाखेत प्रवेश घेता येईल. त्यामुळे देशातील शिक्षणक्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल होतील, असे डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले.

### 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' योजना कार्यान्वित करणार

शिक्षणाचे आदानप्रदान ही उच्चशिक्षणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण बाब आहे. त्यामुळे त्या दृष्टीने विद्यापीठाच्या ज्ञानाचे आदानप्रदान करणे गरजेचे आहे. त्यातून 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्यातून एखाद्या विद्यापीठातील विद्यार्थ्याला संशोधनाची माहिती घेण्याची गरज भासल्यास त्याला ती इंटरनेटच्या माध्यमातून सहजपणे शक्य होईल. त्या अनुषंगाने 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' प्रकल्प सुरू करण्यात येईल. बाराव्या पंचवार्षिक योजनेत त्यासाठी भरीव तरतूद करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

# संशोधनाला बळ देणार नॅशनल नॉलेज नेटवर्क : डॉ. नरेंद्र जाधव

■ पुणे :

आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोग शाळा, ग्रंथालये एकमेकांना जोडणारे नॅशनल नॉलेज नेटवर्क तयार होत आहे, 'येत्या दहा वर्षांत शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत. या संदर्भात पाच महत्त्वाची विधेयके सरकारने तयार केली आहेत. यापैकी काही विधेयकांना संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मान्यता मिळण्याची शक्यता आहे,' अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

'माईर्स एमआयटी' च्या तिसाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जाधव बोलत होते. 'माईर्स एमआयटी' चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, 'माईर्स' चे व्यवस्थापकीय सचिव प्रा. प्रकाश जोशी , तुळशीराम कराड, प्रा. एच. एम. गणेशराव, डॉ. चंद्रकांत पांडव, अधिष्ठाता प्रा. शरचंद्र दराडे-पाटील, सुचित्रा नांगरे-पाटील आदी उपस्थित होते.

'उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या आपल्याकडे कमी आहे. ही संख्या वाढविण्याबरोबरच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचीही आवश्यकता आहे. यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असून, त्यासाठी नॅशनल नॉलेज नेटवर्क तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. याअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी हा प्रकल्प फायद्याचा ठरेल,' असे डॉ. जाधव यांनी सांगितले. 'भविष्यात कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी पंतप्रधान राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय समितीची स्थापनाही नुकतीच करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे,' असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

'एमआयटी'च्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या नऊ व्यक्तींचा 'माईर्स एमआयटी स्थापना दिन' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

18/8/11

# नॅशनल नॉलेज नेटवर्क देणार संशोधनाला बळ

## ■ डॉ. नरेंद्र जाधव यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

'येत्या दहा वर्षांत शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत. या संदर्भात पाच महत्त्वाची विधेयके सरकारने तयार केली आहेत. यापैकी काही विधेयकांना संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मान्यता मिळण्याची शक्यता आहे,' अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये एकमेकांना जोडणारे नॅशनल नॉलेज नेटवर्क तयार होत असल्याचेही त्यांनी सांगितले.



'माईर्स एमआयटी'च्या तिसाव्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जाधव बोलत होते. 'माईर्स एमआयटी'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, 'माईर्स'चे व्यवस्थापकीय सचिव प्रा. प्रकाश जोशी, तुळशीराम कराड, प्रा. एच. एम. गणेशराव, डॉ. चंद्रकांत पांडव, अधिष्ठाता प्रा. शरद्चंद्र दराडे पाटील, सुचित्रा नांगरे-पाटील आदी उपस्थित होते.

'उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या आपल्याकडे कमी आहे. ही संख्या वाढविण्याबरोबरच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचीही आवश्यकता आहे. यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असून, त्यासाठी नॅशनल नॉलेज नेटवर्क तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. याअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी हा प्रकल्प फायद्याचा ठरेल,' असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

'एमआयटी'च्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या नऊ व्यक्तींचा 'माईर्स एमआयटी स्थापना दिन' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. डॉ. पांडव आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. राहुल कराड यांनी प्रास्तविक केले. डॉ. मंगेश कराड यांनी आभार मानले. प्रा. सुधीर राणे यांनी सूत्रसंचालन केले.

### राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम

**'भविष्यात कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी पंतप्रधान राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय समितीची स्थापनाही नुकतीच करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे,' असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.**

महाराष्ट्र टाइम्स
6/8/12



माईर्स एमआईटी के 30वें स्थापनां दिवस पर आयोजित कार्यक्रम का दीप प्रज्वलित कर उद्घाटन करते केंद्रीय योजना आयोग के सदस्य डॉ नरेंद्र जाधव। इस मौके पर अन्य कई गणमान्य भी उपस्थित थे।

महानगर

चिंतन इमेज मेकर्स




संस्कृत भाषेच्या प्रचार आणि प्रसाराबद्दल कालिदास विद्यापीठातर्फे वेदाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी यांचा डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# घैसास गुरुजी, गाडगीळ यांचा कालिदास विद्यापीठातर्फे गौरव

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) - संस्कृत भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी गेल्या चाळीस वर्षांहून अधिक काळ कार्य करणाऱ्या वेदाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी आणि संस्कृत पंडित वसंतराव गाडगीळ यांचा कालिदास विद्यापीठातर्फे गौरव करण्यात आला.

केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते घैसास गुरुजी यांचा गौरव करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे यावेळी उपस्थित होते.

पंडित वसंतराव गाडगीळ यांना 'वृत्तविद्यारत्न', डॉ. टी. एन. धर्माधिकारी आणि डॉ. भाग्यलता पाटसकर यांना 'वेदभूषण' तर डॉ. शैलजा बापट यांना 'वेदांतभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

सामना
20/8/12

# बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाला सर्वाधिक झुकते माप- डॉ. नरेंद्र जाधव

**प्रतिनिधी**

पुणे

'पुढच्या दहा वर्षांत आपल्या शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडणार आहेत. आपल्याकडच्या वाढत्या तरूण लोकसंख्येचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणालाच सर्वाधिक झुकते माप देण्याचा प्रयत्न आहे,' असे प्रतिपादन नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

माईर्स एम.आय.टी. संस्थेच्या २९ व्या वर्धापनदिनाबद्दल रविवारी आयोजित करण्यात आलेल्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून जाधव बोलत होते. माईर्स एम.आय.टी. पुणे च्या विश्वशांती केंद्राचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

जाधव म्हणाले, ''भारतात शिक्षणाचा दर्जा खराब आहे. शिक्षणपद्धतीत लवचीकतेची आणि समान न्यायाचीही कमतरता आहे. इथून जे शिकून तयार होतात त्यातले फारच थोडे जण प्रत्यक्षात नोकरी मिळवू शकतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत.

२०२० साली भारताचे सरासरी वय २७ वर्षे असणार आहे. याच वर्षी युरोपचे सरासरी वय ४२ तर चीनचे सरासरी वय ३७ असेल. भारतात तरूण लोकाची संख्या खूप मोठी आणि सतत वाढती आहे. या तरूणाईचा देशाला पुरेपूर उपयोग करून घ्यायचा असेल तर उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाशिवाय उपाय नाही. आपला आर्थिक विकासदर घसरू न देता तो वाढवण्यासाठी हाच एक मार्ग आहे. शिक्षणाचा आणि संशोधनचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय ज्ञानजालाने सर्व शैक्षणिक उपक्रम एकत्र जोडण्याचा फायदा होणार आहे.' उच्च शिक्षणपद्धतीतील सुधारणांबद्दल बोलताना जाधव म्हणाले की, 'उच्च शिक्षणात 'मेटा युनिव्हर्सिटी' ही संकल्पना रूजायला हवी. आपल्या देशात शाळेनंतरच्या शिक्षणाची आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स अशीच विभागणी प्रचलित आहे.

या पद्धतीत एखाद्याला एखादा अभ्यासक्रम शिकताना तो बदलावासा वाटला किंवा नोकरी करता-करता शिक्षण पुन्हा सुरू करावेसे वाटले तर त्याला सुरूवातीपासून शिक्षणाचा श्रीगणेशा करावा लागतो. याऐवजी ज्याला जो अभ्यासक्रम जेव्हा शिकण्याची इच्छा असेल तेव्हा त्याला तो शिकता यायला हवा.'

या वेळी एस. व्ही. कुलकर्णी, प्रा. शरदचंद्र दराडे पाटील, डॉ. सुरेश जी. घैसास, डॉ. बळवंत फडके, डॉ. ललित के. क्षीरसागर, डॉ. रोहिणी पटवर्धन, प्रा. सुधीर राणे, डॉ. हनुमंत कराड आणि डॉ. बसवराज नागोबा आदींना त्यांच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आले.

संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा. राहुल कराड आणि डॉ. मंगेश कराड, अध्यक्ष ॲड. भास्करराव आव्हाड, प्रा. प्रकाश जोशी, डॉ. चंद्रकांत पांडव आदी या वेळी उपस्थित होते.

लोकसत्ता

# शिक्षण क्षेत्रात 'एमआयटी'चा ठसा : डॉ. जाधव

**पुणे, ता. ५ :** शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) या संस्थेने गेल्या तीस वर्षांत वेगळा ठसा उमटविला आहे, असे मत केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रविवारी येथे व्यक्त केले.

'एमआयटी'च्या ३०व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी प्रा. प्रकाश जोशी, तुळशीराम कराड, प्रा. एच. एम. गणेशराव, चंद्रकांत पांडव, डॉ. मिलिंद पांडे, 'एमआयटी'चे कार्यकारी संचालक डॉ. मंगेश कराड, प्रा. राहुल कराड, डॉ. सुचित्रा नागरे-कराड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक-संचालक डॉ. विश्वनाथ कराड होते. या वेळी डॉ. जाधव यांच्या हस्ते संस्थेच्या विविध शाखांमध्ये काम करणाऱ्या प्राध्यापक, प्राचार्य व अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. जाधव म्हणाले, "गेल्या तीस वर्षांत 'एमआयटी'ने शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात केलेली कामगिरी अचंबित करणारी आहे. देशातील उच्च शिक्षणाची घोडदौडदेखील याच गतीने होण्याची गरज आहे. पुढील १५ वर्षांत उच्च शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल होतील. नॅशनल नॉलेज नेटवर्क हे त्या दिशेने पहिले पाऊल आहे."



**एमआयटी, कोथरूड : 'एमआयटी स्थापना दिवस पुरस्कार' संस्थेचे कुलसचिव सु. वा. ऊर्फ नाना कुलकर्णी यांना रविवारी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) तुळशीराम कराड, डॉ. कराड, कुलकर्णी व डॉ. जाधव.**

या वेळी डॉ. कराड यांचे भाषण झाले. प्रा. राहुल कराड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुधीर राणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मंगेश कराड यांनी आभार मानले.

# कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी प्राधिकरणाची स्थापना - डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - गेल्या काही वर्षांत हिंदुस्थानने आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. मात्र, हा विकास सातत्यपूर्ण ठेवण्यासाठी भविष्यात च्च शिक्षण आणि मूलभूत कौशल्य विकास ा बाबींवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. त्यामुळेच येणाऱ्या पंचवार्षिक ोजनेमध्ये 'कौशल्य विकास प्राधिकरण' थापन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. रेंद्र जाधव यांनी दिली.

माईर्स एमआयटीच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. एमआयटीचे विश्वस्त प्रा. एच. एम. णेशराव, तुळशीराम कराड, डॉ. चंद्रकांत ांडव, संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, मंगेश कराड, प्रा. राहुल कराड यावेळी उपस्थित होते. एमआयटीचे उपाध्यक्ष सुरेश घैसास, अधिष्ठाता प्रा. शरच्चंद्र दराडे, कुलसचिव सु. वा. कुलकर्णी, प्राचार्य ललित क्षीरसागर, रोहिणी पटवर्धन, सर्जन डॉ. बी. जी. फडके, प्रा. सुधीर राणे, कार्यकारी संचालक हनुमंत कराड, लातूरमधील महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बसवराज नागोबा यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

डॉ. जाधव म्हणाले, जगामध्ये सर्वाधिक वेगाने प्रगती करणाऱ्यांमध्ये हिंदुस्थानचा क्रमांक दुसरा आहे. आजपर्यंत केलेल्या प्रगतीमध्ये सातत्य टिकविण्याची गरज आहे. त्यामध्ये उच्चशिक्षण आणि मूलभूत कौशल्ये असणाऱ्या मनुष्यबळ यांना महत्त्वाचे स्थान असणार आहे. येत्या काही वर्षांत शिक्षणाचे स्वरूप आमूलाग्र बदलणार आहे. त्यासाठी विद्यापीठ आणि शिक्षणसंस्थानी पुरेशी तयारी करण्याची गरज आहे. सर्व राज्यांना कौशल्यात्मक विकास अभियान राबविण्यास सांगण्यात आले आहे. त्याप्रमाणे काही राज्यांनी काम सुरू केले आहे.

ते म्हणाले, राज्याच्या अनेक भागांत उच्चशिक्षण पोहचलेले नाही. या शिक्षणाचा दर्जा घसरत आहे. त्यामध्ये ग्रामीण-शहरी, गरीब-श्रीमंत, महिला-पुरुष अशा विषमतेमुळे दरी निर्माण झाली आहे. उच्चशिक्षणातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला पाहिजे. उच्चशिक्षणातील हे सर्व अडथळे दूर करण्याची गरज आहे.प्रा. सुधीर राणे यांनी सूत्रसंचालन केले.



▌माईर्स एमआयटीच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. एमआयटीचे विश्वस्त प्रा. एच. एम. गणेशराव, तुळशीराम कराड, डॉ. चंद्रकांत पांडव, संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, मंगेश कराड, प्रा. राहुल कराड यावेळी उपस्थित होते.

सामना 6/8/12

# शिक्षणावर अधिक गुंतवणुकीची गरज

पुणे : भारताच्या आर्थिक विकासदरात सातत्य ठेवायचे असेल तर शिक्षणावर अधिक गुंतवणूक करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे, असे केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रविवारी येथे सांगितले.

माईर्स एमआयटी संस्थेच्या ३० वा स्थापना दिन डॉ. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत काल साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक, संचालक डॉ. विश्वनाथ कराड अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे संस्थापक विश्वस्त प्रा. प्रकाश जोशी, विश्वस्त प्रा. एच. एम. गणेशराव, तुळशीराम कराड, डॉ. चंद्रकांत पांडव, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. मंगेश कराड, प्रा. राहुल कराड, डॉ. सुचित्रा कराड-नागरे व मिटसॉमचे प्रकल्प संचालक डॉ. मिलिंद पांडे उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, कोठारी कमिशनने शिफारस केल्यानुसार सरकारने शिक्षणावर किमान ६ टक्के गुंतवणूक करणे आवश्यक आहे, मात्र दुर्दैवाने आजवर ४ टक्क्यांचा टप्पादेखील ओलांडलेला नाही. देशाचा विकासदर वाढवायचा असेल तर शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

कार्यक्रमामध्ये डॉ. सुरेश घैसास, प्रा. शरदचंद्र दराडे-पाटील, सु. वा. कुलकर्णी, डॉ. ललित क्षीरसागर, डॉ. बी. जी. फडके, रोहिणी पटवर्धन, प्रा. सुधीर राणे, डॉ. हनुमंत कराड व डॉ. बसवराज एस. नागोबा यांना 'माईर्स एमआयटी स्थापना दिन पारितोषिक' देऊन गौरविण्यात आले.



माईर्स एमआयटी संस्थेच्या ३० व्या स्थापनादिनानिमित्त केंद्रीय नियोजन आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते डॉ. ललित क्षीरसागर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. विश्वनाथ कराड.

केसरी

चिंतन इमेज मेकर्स